जिल्हा कृषि महोत्सवासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१२१/३-अे (ई-१२१७२३१)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २० फेब्रुवारी, २०२६

<u>वाचा</u> :

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.२२६/३अे, दि.१६.१०.२०२०
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ७.०४.२०२५
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७२(ई-१०९३८०८)/३-अे, दि.१३.६.२०२५
४. कृषि संचालक (आत्मा) यांचे पत्र जा.क्र.सं.आत्मा/लेखा/प्र.क्र.४२/जिकृम/९१२/२५, दि.२१.०८.२०२५
५. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१२१(ई-१२१७२३१)/३-अे, दि.२६.९.२०२५
६. कृषि संचालक (आत्मा) यांचे पत्र जा.क्र.सं.आत्मा/लेखा/प्र.क्र.४२/जिकृम/१९५१/२५, दि.३१.१२.२०२५

<u>प्रस्तावना-</u>

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषि योजना / उपक्रमांची माहिती, संशोधित कृषि तंत्रज्ञान, नाविन्यपुर्ण प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव, बाजारपेठ व्यवस्थापन, कृषि पुरक व्यवसाय इत्यादीबाबतचे मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, कृषि प्रदर्शन, कृषि विषयक परिसंवाद आणि अनुभवी शेतकरी / उद्योजकांची व्याख्याने, यशस्वी शेतकरी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व विचारवंत यांची भेट घडावी व सामान्य शेतकऱ्यांना शंका निरसन करुन घेता यावे, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेवर आधारीत धान्य व खाद्य महोत्सव तसेच फळे, फुले व भाजीपाला महोत्सव इत्यादीचे आयोजन करण्यासाठी मुंबई व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये दरवर्षी ५ दिवसांचा जिल्हा कृषि महोत्सव साजरा करण्याबाबत दि.१६.१०.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच महोत्सवाची तारीख “ऑक्टोबर ते मार्च” या कालावधीत घेणेबाबत नमूद केले आहे.

तथापि विभागाच्या दि.१३.६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कोकण विभागाकरिता “ऑक्टोबर ते मार्च” ऐवजी “एप्रिल ते मे” या महिन्यात जिल्हा कृषि महोत्सव आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२५-२६ करिता जिल्हा कृषि महोत्सव योजनेकरिता लेखाशिर्ष-२४०१ एद९१, ३३-अर्थसहाय्य अंतर्गत रु. ६.८० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

कृषि संचालक (आत्मा) यांनी त्यांच्या संदर्भ क्र.६ येथील पत्रान्वये, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये "जिल्हा कृषि महोत्सव" या योजनेकरिता रू.५८०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्याची विनंती केली आहे.

त्यानुषंगाने जिल्हा कृषि महोत्सवासाठी रू.३७६.०० लक्ष इतका निधी आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

१. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये २४०१ एद९१, ३३-अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली जिल्हा कृषि महोत्सवासाठी रू. ३७६.०० लक्ष (अक्षरी रूपये तीन कोटी शहात्तर लक्ष फक्त) इतका निधी आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. याकरिता वितरीत केलेला निधी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर असलेल्या निधीतून खालील लेखाशिर्षाखाली खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**मागणी क्रमांक डी-३**

**(०१) (५४) जिल्हा कृषि महोत्सव योजना**

**(१०० टक्के राज्य योजना) (कार्यक्रम)**

**(२४०१ ए ६९१)**

**३३-अर्थसहाय्य**

३. सदर निधी बीडीएस प्रणालीवर आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना वितरीत करण्यात यावा. तसेच सदर निधी खर्च करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी तसेच सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर योजनेंतर्गत जिल्हा कृषि महोत्सवाचे आयोजन संदर्भाधीन दि. १६.१०.२०२० व दि.१३.०६.२०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार करावे.

५. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आत्मा नियामक मंडळ यांनी जिल्हा कृषि महोत्सव आयोजनाचे अहवाल आयुक्त (कृषि) यांना कार्यक्रम आयोजनानंतर एक महिन्यात सादर करावेत. सदर प्राप्त अहवाल विचारात घेऊन आयुक्त (कृषि) यांनी सदर योजनेचा आढावा घेऊन सदर योजनेच्या मूल्यमापनाचा वार्षिक अहवाल शासनास सत्वर सादर करावा. सदर योजना मूल्यमापनासाठीचे निकष आयुक्त (कृषि) यांनी त्यांचे स्तरावर निश्चित करावेत.

६. सदर वितरीत निधीच्या अंतर्गत झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाकडे सत्वर सादर करण्याची कार्यवाही आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

७. हा आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १८/२०२६/व्यय-१, दि.६.०२.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२०१७२९२२७५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VISHAL DATTATRAY TEKE

Digitally signed by VISHAL DATTATRAY TEKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=B1A35A7424E4C5B594D9CB1798AC47CF07D8F7D496693EFC58A7720A5CDAFC92, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8EB1C9B88DDF43C0CCD87A95BD631AD3EE730CDB839A8115F112376617EAE32F, cn=VISHAL DATTATRAY TEKE
Date: 2026.02.20 17:31:49 +05'30'

**(विशाल टेके)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई, महाराष्ट्र २ नागपूर
६. महालेखापाल, ( लेखा परिक्षा ) महाराष्ट्र-१ मुंबई, महाराष्ट्र २ नागपूर
७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व जिल्हाधिकारी
९. कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.
११.वित्त विभाग, कार्यासन व्यय-१, मंत्रालय, मुंबई.
१२.नियोजन विभाग, कार्यासन-१४३१, मंत्रालय, मुंबई.
१३.कृषि व पदुम विभाग/ कार्या.२ अे, मंत्रालय, मुंबई.
१४.निवड नस्ती /कार्या.३ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.